# रावणायन

## केवळ परिस्थितीवश खलनायक ठरलेल्या एका महानायकाची कहाणी!

इंद्रायणी सावकार

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**रावणायन**
इंद्रायणी सावकार

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
इंद्रायणी सावकार
इ-१००१-५ मंत्री एलिगन्स,
एम. एस. पाल्या, बेंगलोर- ५६००७६
मो. नं. : ०९३२३८७४२२१, ०८०४१५७२९८१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३८०/-

# रावणायन

## अर्पण

संगीता व अजय सिन्हा

# प्रस्तावना

रामायण व महाभारत ही दोन अलौकिक महाकाव्ये आहेत. ती निर्माण होऊन हजारो वर्षे उलटून गेली. साहित्यक्षेत्रात भरघोस प्रगती झाली. भन्नाट प्रयोग झाले. पण या दोन काव्यांची जनमानसावरील पकड शिथिल होत नाही. भारतातील सर्व प्रदेशांत सर्व भाषांतून ही दोन महाकाव्ये प्रचलित आहेतच, पण परदेशातही आहेत. या दोन काव्यांवर आधारित कादंबऱ्या, विश्लेषणात्मक ग्रंथ, चित्रपट, नाटके व मालिका यांचे पीक आपल्या देशात तथा आंतरराष्ट्रीय प्रांगणात येतच असते. ग्रीक भाषेतही महाकाव्ये आहेत. त्यांना हा सन्मान मिळालेला नाही आणि इतर भाषांत एवढ्या लौकिकाची प्राचीन महाकाव्ये असल्याचे ऐकिवातही नाही. बहुधा नसावीतच. याचा स्पष्ट अर्थ मला असा दिसतो की, आपल्या या प्राचीन ठेव्यामध्ये नुसती जादूच नाहीतर अनाकलनीय व अविश्लेषणीय दैवी शक्ती आहे. असलीच पाहिजे. अन्यथा युगानुयुगे या दोन महाकाव्यांच्या गोडीने आबालवृद्धांना मंत्रमुग्ध का करावे?

या दोन्ही महाकाव्यांचे एक लक्षणीय वैशिष्ट्य असे की, त्यांच्यातले खलनायकही आपले हृदय स्पर्शून जातात. नायक जेवढे आपल्याला आकृष्ट करतात तेवढेच हे तथाकथित खलनायकही करतात. किंबहुना हे खलनायक नाहीतच. हे स्वतंत्रपणे समांतर नायकच आहेत.

याच अनुभवातून 'रावणायन' उदयास आले आहे. रामायण म्हणजे रामाचा जीवनप्रवास तर रावणायन हा रावणाचा जीवनप्रवास ऊर्फ अयन आहे. स्वत: रामाने रावणाचा दोन ठिकाणी 'महाब्राह्मण' व 'महानायक' असा गौरवच केलेला आहे. रावण महापराक्रमी होताच होता, पण महाज्ञानी होता व शंकरभक्तही होता.

महाभारतातील संघर्ष भावाभावांमधील युद्ध म्हणून गाजलेला आहे. त्या मानाने रामायणातील संघर्ष सरळसोट आहे असे वरकरणी भासते. 'रावणाने रामाची पत्नी पळवली म्हणून रामाने रावणाशी युद्ध केले व त्याला ठार मारले' अशी ढोबळमानाने रामायणाची रूपरेषा मानली जाते, परंतु असे नाही. रामायणातील

संघर्ष अधिक अचाट आहे, भन्नाट म्हणावा असा आहे. अयोध्या कुठे, किष्किंधा कुठे आणि लंकाद्वीप कुठे? इथे वास्तव्य करणाऱ्या लोकांचा एकमेकांशी परिचय नाही. एकमेकांबद्दल त्यांना साधी जुजबी माहितीही नाही. हे तीन समाजही वेगवेगळे आहेत. अयोध्येचे राजकुमार क्षत्रिय आहेत. किष्किंधेमध्ये वानर-मानवांची वस्ती आहे तर लंकेचा राजा ऋषिपुत्र आहे. या तीन गोटांमध्ये भौगोलिक जवळीक नाही, वैचारिक साम्य नाही आणि त्यांच्या जीवनाच्या कक्षा कुठेही एकमेकांना स्पर्शून जात नाहीत. खेरीज स्वतंत्रपणे यांच्या वेगवेगळ्या समस्या चालू आहेत. तरीही नियतीनं यांना एकत्र गोवले कसे? याचा विचार करून करून आपण थक्क होऊन जातो. नियतीचा हा खेळ अधोरेखित करणे हाही 'रावणायना'चा हेतू आहे.

हे करीत असताना रामायणाची मूळ लाईन मी अजिबात बदललेली नाही. रामायणाचा कॉपीराईट वाल्मिकीकडे आहे, त्याचप्रमाणे रोमहर्षणाकडेही आहे. महाभारतामध्येही एक रामायण आहे. संक्षिप्त आहे, परंतु काही भाग थोडासा वेगळा आहे. त्यात रावणाच्या पूर्वजन्माची कथा आहे. ती मी घेतलेली आहे. 'रावण- वध अटळ होता. त्यासाठी रावणाने खलनायक असण्याची गरज नाही.' हा मुद्दा अधोरेखित करणे हाच या पूर्वजन्मीच्या कथेचा हेतू आहे. 'रावण जर दुष्ट नव्हता तर त्याचा वध करण्याचा प्रसंग रामावर का व कसा ओढवला?' या प्रश्नाचे उत्तर म्हणजे 'रावणायन.' हा वध करणे रामाला जड गेले हे रामायणावरून स्पष्ट होते. वधाची प्रेरणा मिळणे कठीण तसेच शारीरिक वध करणेही कठीण गेले.

रामायणाचे असंख्य पाठ आहेत. प्राचीन आहेत. अनेक भाषांतून आहेत. अनेकांमध्ये राम-रावण कथा वेगळीच आहे. वाल्मिकीच्या रामायणातील एकच उल्लेख मी स्वीकारलेला नाही. तो म्हणजे रावणाच्या तीन-चार पत्नींचा उल्लेख. या पत्नी कुठल्या? त्याला कशा मिळाल्या? कोणता पुत्र कोणाचा? याचाही स्पष्ट खुलासा नाही. 'रावणाच्या सर्व पत्नींनी शोक केला' अशासारखे ढोबळ उल्लेख आहेत. प्रमुख भूमिका मंदोदरीलाच आहे. ती पाच पतिव्रतांपैकी एक आहे. मी ती एकटीच रावणाची पत्नी ठेवलेली आहे. 'एकदा का रावणाची व्यक्तिरेखा दुष्ट करण्याचे ठरले की, मग मारा रावणाच्या माथी सर्व दुर्गुण' असा पवित्रा रामायणाच्या नंतरच्या लेखकांनी घेतला असावा, अशी माझी कल्पना आहे. रावणाच्या स्त्रीलोलुपतेचा उल्लेख अनेक ठिकाणी आहे. त्यामुळे तो त्याचा दुर्गुण मी स्वीकारलेला आहे.

मंदोदरी व रावण यांचा विवाह कसा काय जमला याचाही उल्लेख नाही. परंतु ही दोघं वेगवेगळ्या समाजातली आहेत. रावण ऋषिपुत्र आहे तर मंदोदरी मयासुरपुत्री म्हणजे राक्षसकन्या आहे. भिन्न समाजातील विवाह सामान्यत: प्रेमविवाह असतात. हे जमेस धरून रावण-मंदोदरी प्रेमकथा मी रंगवली आहे. रावण माझा कथानायक आहे. कथानायकाचे प्रेम बसल्याशिवाय कथा पुढे जाणारच नाही. प्राचीन काळचे कवी व लेखक भावनांना, मनोविश्लेषणाला व तर्कशुद्धतेला प्राधान्य देत नव्हते. कथानक पुढे ओढतेवेळी तर्काची वा स्वभावरेषांसंबंधित काही अडचण भासली तर पूर्वजन्म व शाप-उ:शाप यांचा मुक्तहस्ते वापर करायचा अशी त्या वेळची धाटणी होती. आता ही धाटणी चालण्याजोगती नाही. म्हणून जादूटोणादी उल्लेख मी काढून टाकले आहेत व तर्कशुद्धतेच्या आधारावर पात्रांच्या स्वभावांचे रेखाटन केले आहे. काही घटना तर्काच्या निकषात बसत नाहीत. त्यांच्यात थोडासा बदल करावा लागला.

उदाहरणार्थ-

सीतेला सुवर्ण हरीण दिसला, त्याच्या कातड्याची चोळी घालण्याची इच्छा तिनं रामापाशी प्रकट केली या प्रसंगाची भरपूर चेष्टा अलीकडच्या साहित्यात झाली आहे. परंतु समग्र रामकथा वाचल्यानंतर मला जाणवलं की, हा चेष्टेचा विषय नाही. गंभीर विषय आहे. सीता पूर्वजन्मी वेदवती होती. स्त्री असूनही तिनं तपस्वी पुरुषासारखे हरिणाजिन लेवले व विष्णू पती मिळावा यासाठी तपश्चर्या करू लागली. सीतेचा जन्म घेतल्यानंतरही पूर्वजन्मातील काही इच्छा म्हणा, आठवणी म्हणा तिच्या मनात तरळत राहिल्या. त्या आठवणीमुळे ती हरिणाजिनाकडे खेचली गेली. तिला डोहाळेही लागले होते. जिनाची चोळी शिवणं अशक्य! हरिणाजिन ती स्वत:भोवती गुंडाळणार होती.

रामायणात काही अनुत्तरित प्रश्न राहिलेले आहेत. वाल्मिकीच्या प्रतिभेतून अभावितपणे सुटलेले आहेत. शक्य तिथे मी या अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे पुरवली आहेत. माझ्या स्वत:च्या युक्तिवादानुसार, कथानकाची 'लाईन' न कापता, पण तर्काचा आधार घेऊन पुरवली आहेत. उदाहरणार्थ, रावणाने सीतेला का पळवले? याचे सर्वसामान्य उत्तर आहे-'सीतेबद्दल त्याला अभिलाषा वाटली म्हणून' परंतु हे उत्तर मतीस पटत नाही. कारण सीतेला त्याने त्रास दिला नाही. अशोकवनात पहाऱ्यात ठेवून दिली फक्त! सीतेच्या अपहरणाचे कारण फारसे सबळ नाही हे वाल्मिकीलाही जाणवले. म्हणून रावणाने सीतेवर अत्याचार न करण्याचे कारण

त्याने पेश केले–'कोणत्याही स्त्रीवर तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केलास तर मरून पडशील' असा मंदोदरीने रावणाला शाप दिला होता असे वाल्मिकीकृत समर्थन आहे. परंतु या समर्थनामुळे आणखी काही अनुत्तरित प्रश्न समोर येतात. सीतेचे रामावर अतूट प्रेम आहे व ती आपल्याला कदापि वश होणार नाही, एवढी साधी गोष्ट रावणाच्या लक्षात येत नव्हती का? बरे, समजा त्याला आशा वाटली की, आज ना उद्या सीता आपल्यावर भाळेल आणि आपली मनोकामना पूर्ण करील, तर निदान त्याने तिचा अनुनय तरी करायला हवा की नाही? तेही तो करीत नाही. अशोकवनात रावणाने सीतेची कधीही भेट घेतली नाही. सीतेच्या मनात आपल्याबद्दल प्रेमभावना जागृत होईल याची फक्त वाट पाहात बसला हे कसे शक्य आहे?

स्वयंवराचे वेळी रावण शिवधनुष्य उचलू शकला नाही. खाली पडला. त्या वेळी सीता हसली. या अपमानाचे शल्य मनात ठेवून रावणाने सीतेला पळवले असेही एक उत्तर आहे. पण अपमानाचा सूड घेण्यासाठी रावणाने एवढी वर्षे वाट पाहिली? अपमानित झाला, तर तिथेच युद्धाला उद्युक्त का झाला नाही? भीष्म, कृष्ण वगैरे अनेकांनी स्वयंवर–मंडपात किंवा मंडपाच्या बाहेर पण त्याच क्षणी युद्धे केली नाहीत काय? तेव्हा अपमानाची सबब तर्काच्या कसोटीस उतरत नाही. मंदोदरीच्या शापाची कथादेखील तर्क–सयुक्तिक वाटत नाही. कारण रावण अमर होता. ब्रह्मदेवाने त्याला अमरत्व दिले होते. अमर जर होता तर परस्त्रीवर बलात्कार केल्याने मरणार कसा? प्रत्यक्ष रामानेही रावणाने सीतेवर बळजोरी न केल्याचे कौतुक केले आहे.

सीताहरणाचे खरे कारण चंद्रमुखीला लक्ष्मणाने विद्रूप केले हेच आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

परंतु येथे हे महत्त्वाचे आहे की, रावणाने सूड उगवण्यासाठी राम–लक्ष्मणावर हल्ला केला नाही. असे करणे त्याला सहज शक्य होते. तो स्वत: अमर असल्यामुळे मरणार नव्हता. यापूर्वी त्याने इंद्रादी देवांवरही हल्ले केले. पण राम–लक्ष्मण वनात एकटे असूनही त्यांच्यावर त्याने हल्ला केला नाही. त्यांना शारीरिक इजा करण्याचा प्रयत्नही केला नाही. लक्ष्मणाने चंद्रमुखीला विद्रूप करून रावणाला दुखावले. रावणाने सीतेला पळवून रामलक्ष्मणांना दुखावले. पण सीताहरणामुळे साध्य काय झाले? किंवा भविष्यात तरी साध्य काय होणार? सीता जन्मभर तुरुंगात राहणार हे शक्यच नव्हते. राम तिला सोडवायला येणारच येणार, युद्ध होणारच